
# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/११/२०२५ ( रविवार )**

---

## पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील अवैध जुगार व्यवसायातील सक्रीय २ सराईत गुन्हेगारांना एम.पी.डी.ए. कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील सराईत आरोपी नामे १) **रतन उर्फ रत्नाकर संतोष तागडे, वय ५६ वर्ष, रा. प्रभाग क्र. ०३, नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर** आणि २) **संदीप उर्फ गडबड किशोर कठाणे, वय ३८ वर्ष, रा. प्रभाग क्र. १७, नरखेड ता. नरखेड जि. नागपूर यांनी** नरखेड शहर व परिसरात अवैध जुगार अड्डे सुरू केले होते तसेच दोन्ही आरोपीतांवर अवैध जुगाराचे, मपोका तसेच इतर विविध कलमान्वये अनेक गुन्हे दाखल असून नमुद आरोपी हे गुन्हे करण्याच्या सवयीचे आहे. त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती तसेच नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीसांनी त्यांचेविरूध्द वेळोवेळी कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु नमुद दोन्ही आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीन जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनाखाली नरखेड पोलीसांकडुन एम.पी.डी.ए. कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार नमुद दोन्ही आरोपीतांविरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.



रतन उर्फ रत्नाकर संतोष तागडे



संदीप उर्फ गडबड किशोर कठाणे

# अवैधरीत्या गांजा (अंमली पदार्थ) बाळगुन विक्री  करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०८/११/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने खबर मिळाली की, आरोपी नामे जागेश्वर उर्फ नानबच्चा शिवबालक कश्यप हा  त्याचे घरी मौजा वाघोडा, ता. सावनेर येथे अवैधरित्या गांजा बाळगुन गांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ पंचासमक्ष मौजा वाघोडा येथे पंचासह धाड टाकुन आरोपी नामे आरोपी नामे जागेश्वर उर्फ नानबच्चा शिवबालक कश्यप,  वय ४५ वर्ष ,रा. मस्के ले आउट, वार्ड क्रं ३, वाघोडा, ता सावनेर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली तसेच त्याचे घराची पंचासमक्ष झडती घेतली असता अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष ०.९१३ किलो गांजा किंमती १३,१५५/— रूपये असा मुद्देमाल जप्त केला आहे.

**आरोपी जागेश्वर उर्फ नानबच्चा शिवबालक कश्यप,  वय ४५ वर्ष ,रा. मस्के ले आउट, वार्ड क्रं ३, वाघोडा, ता सावनेर याचे विरुध्द पोस्टे सावनेर येथे एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## १९ गोवंश जनावरांची सुटका,मौदा पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०९/११/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा खराडा पुर्नवसन, हनुमान मंदीर येथे दोन वाहनांमध्ये अवैधरित्या गोवंश जनावरे भरून कत्तलीकरीता घेवुन जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा खराडा पुर्नवसन, हनुमान मंदीर येथे जावुन पाहणी केली असता पिकअप वाहन क्रमांक एम. एच. ४९ डी ४७३३ आणि टाटा एस वाहन क्रमांक एम. एच. ४० सी एम ५५८० हे दिसुन आले. पिकअप वाहन क्रमांक एम. एच. ४९ डी ४७३३ चालक आरोपी नामे **निखील इश्वर थोटे, वय २५ वर्षे, रा. राजेदहेगाव, ता. भंडारा जि भंडारा** यास ताब्यात घेवुन वाहन मालकाचे नाव विचारले असता **अभिषेक इश्वर थोटे, वय २७ वर्षे, रा. राजेदहेगाव, ता. भंडारा जि भंडारा** अशी माहीती प्राप्त झाली. टाटा एस वाहन क्रमांक एम. एच. ४० सी एम ५५८० चा चालक पोलीसांना पाहुन आंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी दोन्ही वाहनाची तपासणी केली असता पिकअप वाहन क्रमांक एम. एच. ४९ डी ४७३३ मध्ये १० गोवंश जनावरे तसेच टाटा एस वाहन क्रमांक एम. एच. ४० सी एम ५५८० मध्ये ९ गोवंश जनावरे असे एकुण १९ मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १. पिकअप वाहन क्रमांक एम. एच. ४९ डी ४७३३ किंमती ७,००,०००/— रूपये, २. टाटा एस वाहन क्रमांक एम. एच. ४० सी एम ५५८० किंमती ५,००,०००/— रूपये आणि १९ गोवंश जनावरे किंमती १,९०,००० /— रूपये असा एकुण किंमती १३,९०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या १९ गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन गौ अनुसंधान बहुउद्देशीय संस्था, गोशाळा , मालीपार ता.जि. भंडारा येथे दाखल करण्यात आले आहे.

**नमुद प्रकरणी १. निखील इश्वर थोटे, २. अभिषेक इश्वर थोटे, रा. राजेदहेगाव, ता. भंडारा जि भंडारा आणि टाटा एस वाहन क्रमांक एम. एच. ४० सी एम ५५८० चालक आणि मालक यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**




## पोलीस ठाणे उमरेड हद्दीतील मौजा गरदापार, पारधी बेडा येथील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपीतांवर गुन्हे नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण आणि उमरेड पोलीस यांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०९/११/२०२५ रोजी स्थनिक गुन्हे शाखा आणि उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, उमरेड पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा गरदापार पारधी बेडा येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन रेड केली असता आरोपी क्रं १ **रणजित विश्वनाथ राजपुत ,रा गरदेपार पारधी बेडा, ता. भिवापूर जि नागपुर** याचेवर कारवाई करत १) १६४० लिटर मोहाफुल सडवा रसायन किंमती ५७,४००/—रू. २) ४० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ४०००/— रू. आणि इतर साहित्य असा एकुण ७३,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. **आरोपी क्रं २ सुभाष रामप्रसाद पवार ,रा गरदेपार पारधी बेडाा, ता. भिवापूर जि नागपुर** याचेवर कारवाई करत १) २०४० लिटर मोहाफुल सडवा रसायन किंमती

७१,४००/—रू. २)  ५० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ५०००/— रू. आणि इतर साहित्य असा एकुण ९०,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. **आरोपी क्रं ३ महीला आरोपी** हीचेवर कारवाई करत  १) २०० लिटर मोहाफुल सडवा रसायन किंमती ७,०००/—रू. आणि इतर साहित्य असा एकुण ८,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.  **सदर कारवाईत एकुण १,७२,६०० रूपयांचा मुद्देमाल मळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा करून नष्ट करण्यात आला. नमुद ३ आरोपीताविरुद्ध    महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३ गुन्हे नोंदविण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री, सेंवन करणाऱ्या आरोपीविरूद्ध ६१ आरोपीतांविरूध्द ६१ गुन्हे नोंद

दिनांक ०८/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू असा एकुण १७,८६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण ८ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला  येथे एकुण ४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे एकुण ४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे एकुण २  गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर  येथे एकुण ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन वेलतुर येथे १ गुन्हा नोंद आहे, पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे, पोलीस स्टेशन खापा येथे ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे ६ गुन्हे नोंद आह. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे पोलीस स्टेशन काटोल येथे एकुण ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ९ गुन्हे  नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे ६ गुन्हे  नोंद आहे.पोलीस स्टेशन देवलापार येथे २ गुन्हे  नोंद आहे. अशाा एकुण ६१ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ६१ गुन्हे नोंद केले आहे.

**वरील कारवाईत ३३५७० मिली देशी दारू किंमती १४९८५/—रूपये, २५५ लीटर मोहाफुल दारू , १७४० लिटर सडवा आणि साहित्य किंमती १०२७००/—रूपय तसेच १८०० मिलि विदेशी दारु किंमती २२००/— रूपये असा एकुण १,१९,८८५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नााशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने